




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २३०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०१ एप्रिल २०२५







# औरंगजेबाची कबर हटवता येणार नाही, पण; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, मुंबई :** फेब्रुवारी महिन्यात छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी होऊ लागली. भाजपाचे खासदार उदयनराजे भोसले यांनीही औरंगजेबाची कबर उखडून टाका अशी मागणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता ही कबर हटवता येणार नाही असं म्हटलं आहे.



**औरंगजेबाच्या कबरीचा वाद काय?**

छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून औरंगजेबाच्या विरोधात राज्यभरात रोष पाहण्यास मिळाला. खासदार उदयनराजे भोसले यांनी औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याची मागणी केली. त्यानंतर काही हिंदुत्ववादी संघटनांनीही असाच इशारा दिला. गरज पडल्यास कारसेवा करु आणि कबर हटवू असंही या संघटनांनी सांगितलं. यानंतर औरंगजेबाच्या कबरीला अडख म्हणजेच भारतीय पुरातत्व खात्याने संरक्षण दिलं आहे. राज ठाकरे यांनीही ही कबर उखडू नका उलट तिथे फलक लावा आणि मराठ्यांनी औरंगजेबाला इथे गाडला हे सगळ्यांना सांगा अशी भूमिका घेतली आहे. आता देवेंद्र फडणवीस यांनी ही कबर हटवता येणार नाही असं म्हटलं आहे.

**काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?**

औरंगजेबाच्या कबरीबाबत राज ठाकरेंच्या भूमिकेवर प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपल्याला आवडो न आवडो, मात्र हे मान्य करावंच लागेल की औरंगजेबाची कबर ही भारतीय पुरातत्व खात्याच्या अखत्यारित येते. या कबरीला भारतीय पुरातत्व खात्याने संरक्षण दिलं आहे. त्यामुळे कबर तिथून हटवता येणार नाही. मात्र औरंगजेबाचं उदात्तीकरण आम्ही कदापि मान्य करणार नाही. इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे.

**औरंगजेबाविषयी काय म्हणाले राज ठाकरे?**

औरंगजेबाने तेव्हा परत जायला पाहिजे होतं. मात्र, एवढ्या मोठ्या बलाढ्य प्रदेशाचा राजा महाराष्ट्रात ठाण मांडून का बसला होता? कारण औरंगजेबाला शिवाजी नावाचा विचार मारायचा होता. पण हे औरंगजेबाला जमलं नाही, सर्व प्रयत्न केले आणि शेवटी औरंगजेब येथेच मेला. जगाच्या इतिहासात औरंगजेब वाचला जातो. तेव्हा जगभरातील लोकांना कळतं की औरंगजेब काय करायला गेला होता आणि कसा मेला. तेव्हा तेथे जगभरात छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव येतं, असंही राज ठाकरे म्हणाले.

**औरंगजेबाच्या कबरीबाबत राज ठाकरे काय म्हणाले?**

औरंगजेबाच्या कबरीबाबत बोलताना राज ठाकरे म्हणाले होते, औरंगजेबाची सध्याची सजवलेली कबर काढून टाका. तेथे फक्त कबर दिसली पाहिजे आणि त्या ठिकाणी एक मोठा बोर्ड लावा. आम्हा मराठ्यांना संपवायाला आलेला औरंगजेब येथे गाडला गेला. हा आमचा इतिहास आहे, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

## थोडक्यात

### 'अहिल्यानगर जिल्ह्याला यलो अलर्ट'

### आज वादळी वाऱ्यासह गारपिटीची शक्यता...




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** जिल्ह्यात ३१ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत विजांच्या कडकडाटांसह वादळी वारा, हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने व्यक्त केली आहे. १ एप्रिल रोजी वादळी वाऱ्यासह गारपिटीची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे. जिल्ह्यासाठी येलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे जनतेने सतर्कता बाळगावी,असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने केले आहे. यंदा पाऊसपाणी भरपूर झाला. मार्चपर्यंत भूजलपातळी देखील चांगली असल्यामुळे रब्बी हंगामातील पिके जोमदार आली. रब्बी पिकांची बहुतांश ठिकाणी काढणी झालेली आहे. काही ठिकाणी गहू व इतर पिके काढणीचे बाकी आहेत. हवामान खात्याने सोमवार ते बुधवार या तीन दिवसांत पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे रब्बी पिकांना या पावसाचा फटका बसण्याची शक्यता बाळगली आहे. त्यामुळे आहे ती उभी पिके काढण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग वाढली आहे. मेघगर्जनेच्या वेळी विजा चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये, विजेपासून बचाव करण्यासाठी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा,मोकळे मैदान, टॉवर,ध्वजाचे खांब, विद्युत खांब, विद्युत वाहिनी अथवा रोहित्रांजवळ थांबू नये, गारपिटी दरम्यान, मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा,विजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुढग्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्याच्या मध्ये झाकावे, शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा, बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असल्यास त्याचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे पोलिस स्टेशन, तहसील कार्यालय आदी ठिकाणी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र पाटील यांनी केले आहे.

### संपूर्ण पुणे शहराचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद

**दि.३१, पुणे :** उन्हाळ्यापूर्वी जलवाहिन्यांची तातडीची देखभाल दुरुस्तीची कामे येत्या गुरुवारी (३ एप्रिल) महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात येणार आहेत. त्यामुळे गुरुवारी संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार असून दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी (४ एप्रिल) सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. जुने आणि नवीन पर्वती जलशुद्धीकरण केंद्र, भामा आसखेड, लष्कर जलकेंद्र, होळकर जलकेंद्र, वडगाव जलकेंद्र, राजीव गांधी पंपिंग, खडकवासला जॅकवेल, वारजे जलकेंद्र, एसएनडीटी, चांदणी चौक, गांधीभवन टाकी, पॅनकार्ड क्लब, वारजे जलकेंद्र, चतु:शृंगी जलकेंद्र, कोंढवे-धावडे जलकेंद्र यांच्यासह अन्य जलकेंद्रातील जलवाहिन्यांमध्ये ही कामे करण्यात येणार आहेत, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली. मध्यवर्ती भाातील सर्व पेठा, क्वार्टरगेट परिसर, गंजपेठ, गुरुवार पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, लोहिया नगर, दत्तवाडी परिसर, राजेंद्रनगर, लोकमान्यनगर, डेक्कन परिसर, शिवाजी नगर, स्वारगेट, सहकारनगर, पद्मावती, बिबवेवाडी, मुकुंदनगर, महर्षीनगर, गंगाधाम, चिंतामणीनगर १ आणि २, लेक टाऊन परिसर, अप्पर इंदिरानगर, लोअर इंदिरानगर, बिबवेवाडी गावठाण, डायस प्लॉट, ढोले मळा परिसर, सॅलेसबरी पार्क, गिरीधर भवन चौक परिसर, पर्वती गावठाण, मीठानगर, शिवनेरी नगर, भाग्योदयनगर, कोंढवा खुर्द, पर्वती दर्शन, तळजाई, कात्रज, धनकवडी परिसर, हडपसर, सातववाडी, गोंधळेनगर, ससाणेनगर, काळे पडळ, बीटी कवडे रस्ता, भीमनगर, रामटेकडी, औद्योगिक परिसर, वानवडी, पुणे कॅन्टोन्मेंट परिसर, केशवनगर, साडेसतरा नळी, फुरसुंगी, उरूळी देवाची, मांजरी बुद्रुक, शेवाळवाडी, खराडी, वडगांवशेरी, ताडीवाला रस्ता, मंगळवार पेठ, मालधक्का, येरवडा, रेसकोर्स, मुळा रस्ता, खडकी, हरीगंगा सोसायटी, लोहगांव, विमाननगर, वडगांवशेरी, कल्याणीनगर, विश्रांतवाडी, फुलेनगर, येरवडा, कळस, धानोरी, पाषाण, भूगाव रस्ता, बावधन, उजवी आणि डावी भुसारी कॉलनी, डगांव, धायरी, आंबेगाव पठार, दत्तनगर, भारती विद्यापीठ परिसर, कोंढवा बुद्रुक, आंबेगाव, येवलेवाडी या भागाचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद राहणार आहे.

# पंढरपूरात देशी बनावटीची पिस्टलसह आरोपी जेरबंद

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.३१, पंढरपूर :** अर्जुन भोसल उपविभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर व सहा पोलीस अधिक्षक अंजना कृष्णा व्ही एस यांचे मार्गदर्शनाखाली दि. २६ एप्रिल २०२५ रोजी गुन्हे प्रकटीकरण पथकासह पो. ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक गस्त करीत असता गुप्त बातमीदाराकरवी माहिती प्राप्त झाली की, पंढरपुर ग्रामीण पोलीस ठाणे हददीतील जुना अकलुज रोड, पुणे हायवेच्या ब्रीज खाली एक इसम हा त्याचे जवळ देशी बनावटीचे रिव्हॉल्वर बाळगुन फिरत आहे.

सदर बातमी बाबत सहा पोलीस अधिक्षक अंजना कृष्णा मॅडम यांनी आम्हा गुन्हे प्रकटीकरण शाखेस हकीकत सांगून सदर प्राप्त माहितीची खातरजमा करून कारवाई करणेकामी पथक तात्काळ रखाना केले.

सदर ठिकाणी सापळा रचून संशईत इसम नामे अरवींद भिमराव आटकळे वय-३२ वर्ष, रा. कौठाळी ता पंढरपुर, जि. सोलापूर यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेस एक देशी बनावटीचे पिस्टल मॅक्झीनसह मिळून आले ते पुढील कारवाई कामी ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणेत भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३, २५, अन्वये गुन्हा दाखल करुन त्यास अटक करण्यात आली आहे.



सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर उपविभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर अर्जुन भोसले सो, यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहा पोलीस अधिक्षक अंजना कृष्णा मॅडम, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोसई अनिल पाटील, पोसई विरसेन पाटील पोहेका / इरफान मुलाणी, शोएब पठाण, पोकॉ/अजित मिसाळ, गणेश पाटील सायबर पोलीस ठाणेकडील रतन जाधव यांनी केली आहे.

# अनैतिक संबंधांची किनार! पोलीस हत्या प्रकरणी चार आरोपी गजाआड

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, बुलडाणा :** देऊळगाव राजा परिसरात एका बंद चार चाकी वाहनात काल रविवारी आढळलेल्या पोलिसाच्या मृतदेहाने पोलीस दल हादरले होते. पोलिसाची हत्या करण्यात असल्याचे स्पष्ट झाल्यावर पोलिसांनी जलद गतीने तपास चक्रे फिरविली! काही तासातच प्रकरणाचा छडा लावून आरोपीना जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. दरम्यान या प्रकरणाला अनैतिक संबंधाची किनार असल्याचे विस्तृत तपासात निष्पन्न झाले आहे. मृत पोलिसाच्या नात्यातील व गावातील एका स्थानिक पुढाऱ्याने एका कुख्यात गुंडाला सुपारी देऊन पोलिसाला संपविल्याचे आढळून आले. यापूर्वी देऊळगाव राजा परिसरआणि पोलीस दल काल रविवारी, ३० मार्च ला अक्षरशः हादरला होता. देऊळगाव राजा सिंदखेडराजा रस्त्यावरील आर. जे. इंटरनॅशनल स्कूलसमोरील वनविभागाच्या जागेत मारोती स्विफ्ट वाहनात एका पोलिसाचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली होती. तपासाअंती पोलीस कर्मचाऱ्याची गळा आवळून होऊन हत्या केल्याचे समोर आले होते.

**वेगवान तपास !**



दरम्यान घटना स्थळी दाखल झालेले पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनात उप विभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे व त्याची चमू, देऊळगाव राजा पोलीस ठाण्याचे ठाणेदार संतोष महल्ले यांनी सुनियोजित वेगवान तपास केला. या प्रकरणातील मुख्य आरोपीला दुपारीच ताब्यात घेतले . खून अनैतिक संबंधातून झाल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणात आतापर्यंत ४ आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मुख्य आरोपीचे नाव बाबासाहेब म्हस्के(४२) असून तो गिरोला खुर्दच्या राजकारणात सक्रिय आहे, त्याची पत्नी माजी सरपंच आहे. सध्याही आरोपी बाबासाहेब म्हस्के याची पत्नी ग्रामपंचायत सदस्य आहे.अनैतिक संबंधतूनच हा खून झाल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

**आणि सुपारी...**

ज्ञानेश्वर म्हस्के हे जालना पोलिस दलात राष्ट्रीय महामार्ग वाहतूक पोलिस म्हणून कार्यरत होते. मूळचे गिरोली खुर्द (राहणार देऊळगाव राजा) येथील रहिवासी आहेत. ज्ञानेश्वर म्हस्के जालना येथे अंबड चौफुली येथे पत्नी व दोन अपत्यांसह राहत होते. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी बाबासाहेब म्हस्के व मृतक पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर म्हस्के सोयरे असून एकमेकाचे मित्र होते. घट्ट दोस्ती होती. या दोस्तीचा बाबासाहेब म्हस्के याने 'गैरफायदा' घेतला. त्याचे म्हस्के यांच्या पत्नीशी अनैतिक संबंध सुरू झाले. या संबंधात अडसर ठरत असल्यानेच ज्ञानेश्वर म्हस्के यांचा काटा काढायचे बाबासाहेब म्हस्के याने ठरवले होते. त्यासाठी त्याने जालना येथील टायगर नामक एका गुंडाला ५ ते ६ लाख रुपये सुपारी दिली होती. त्यांनी २९ मार्चचा दिवस निवडला. टायगरने त्याची दोन माणसे त्या कामासाठी बाबासाहेब म्हस्के याच्या ताब्यात दिली. २९ मार्चच्या रात्री देऊळगाव राजा मार्गावरील एका हॉटेल मध्ये बाबासाहेब म्हस्के याने मृतक ज्ञानेश्वर म्हस्के यांना दारू पाजली.

हॉटेलचे बिल देखील बाबासाहेब म्हस्के यानेच दिले. सदर प्रकाराचे सीसीटीव्ही फुटेज देखील पोलिसांना प्राप्त झाले आहेत. त्यानंतर बाबासाहेब म्हस्के आणि टायगर ने पुरवलेल्या दोन गुंडांनी ज्ञानेश्वर म्हस्के यांचा गळा आवळून निर्घृण हत्या केली . मृतदेह गाडीत टाकून गाडी गिरोली खुर्द गावाजवळील आरजे इंटरनॅशनल स्कूल समोरील वनविभागाच्या जागेत नेऊन ठेवत आरोपी पसार झाले. रविवारी घटना उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी तांत्रिक आणि गोपनीय माहितीवरून बाबासाहेब म्हस्के याला ताब्यात घेतले, त्याची कसून चौकशी केल्यानंतर त्याने खुनाची कबुली दिली..




## डॉ. हेडगेवार

छत्रपती संभाजीनगर शहरात स्वयंसेवक डॉक्टरांनी चालू केलेल्या 'डॉ. हेडगेवार रुग्णालया'च्या नव्या इमारतीच्या लोकार्पण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते सुप्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा. मुंबईहून त्यांच्या विमानातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी या कार्यक्रमासाठी येत होते. रुग्णालयाची माहितीपत्रके, निमंत्रणपत्र, आमंत्रण पत्रिका रतन टाटा पाहात होते. त्यांनी गडकरी यांना विचारले की, 'डॉक्टर हेडगेवार यांनी या रुग्णालयाला देणगी दिली आहे का?' जगातल्या सर्वात मोठ्या संघटनेच्या संस्थापकांचे नाव माहिती नसणे हे रतन टाटा यांचे अज्ञान नाही तर हे डॉक्टर हेडगेवार यांचे वैशिष्ट्य होते. त्यांनी स्वत:ला सर्व प्रकारच्या प्रसिद्धीपासून पूर्णपणे दूर ठेवले होते. आजही आपल्या देशात हजारो विद्वान तसेच सन्मानित मंडळी असतील, ज्यांना संघ संस्थापकांचे नाव माहिती नसेल.

प्रारंभीच्या काळात संघगीतातील वृत्तपत्र में नाम छपेगा, पहनुंगा स्वागतसम हार,

छोड दो ये क्षुद्र भावना, हिंदुराष्ट्र के तारणहार।।

या दोन ओळीतील अर्थ जगलेल्यांपैकी एक म्हणजे डॉक्टर हेडगेवार होत. १९३६च्या मे महिन्यात नाशिकचे शंकराचार्य डॉक्टर कुर्तकोटी स्वामी यांनी जगद्गुरू आद्य शंकराचार्यांच्या जयंतीनिमित्ताने डॉ. हेडगेवार यांना 'राष्ट्र सेनापती' ही पदवी घोषित केली. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रातून ही बातमी प्रसिद्ध होताच डॉक्टरांच्या काही मित्रांनी व अनुयायांनी अभिनंदन करणारी पत्रे त्यांना पाठवली. डॉक्टरांनी सर्व संबंधितांना पत्र पाठवून कळविले की, 'या पदवीचा उपयोग कोणीही व केव्हाही करू नये.' त्या काळातील महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध संपादक गो. गो. अधिकारी व नागपूरचे दामोदर भट यांनी डॉक्टरांचे जीवन चरित्र लिहिण्याची इच्छा व्यक्त केली, परंतु डॉक्टरांनी त्यांना अतिशय गोड शब्दांत पण स्पष्टपणे नकार दिला. त्यामुळेच आज आश्चर्य वाटते की 'संघटन जगप्रसिद्ध पण संस्थापक अप्रसिद्ध !' डॉक्टर हेडगेवार जन्मजात देशभक्त होते. वयाच्या नवव्या वर्षापासून त्यांची देशभक्तीची भावना व पारतंत्र्याबद्दलची चीड विविध प्रसंगी प्रकट झाली आहे. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर वैद्यकीय शिक्षणासाठी त्यांनी कोलकात्याच्या नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला, कारण क्रांतिकारकांचे ते एक प्रमुख केंद्र होते. तेथील 'अनुशीलन समिती' या क्रांतिकारक संघटनेचे ते अंतरंग सदस्य झाले. वैद्यकीय शिक्षणाच्या शेवटच्या परीक्षेत ७०.०८ गुण मिळवून ते उत्तीर्ण झाले. १९१५ मध्ये ते नागपूरला परत आले तेव्हा तत्कालीन मध्य प्रांतात केवळ ७५ डॉक्टर होते. वैद्यकीय व्यवसाय करून ते लाखो रुपये कमावू शकले असते पण त्यांनी आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी चालू असलेली आंदोलने, चळवळी यात ते सहभागी झाले. १९२१ च्या असहकार आंदोलनात त्यांनी भाग घेतला. इंग्रजांनी केलेली भाषण बंदी मोडून इंग्रजी राजवटीविरुद्ध जहाल भाषणे केल्याबद्दल त्यांना एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा झाली. १९३० मध्ये गुजरातमध्ये महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली मिठाचा सत्याग्रह झाला. तेव्हा यवतमाळ जिल्ह्यात झालेल्या जंगल सत्याग्रहात डॉक्टर हेडगेवार यांनी एका तुकडीचे नेतृत्व केले. त्यात त्यांना नऊ महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली.

डॉ. हेडगेवार यांचे चिंतन व निष्कर्ष

१९१४ ते १९२५ या १२ वर्षात केलेल्या सर्व प्रकारच्या चळवळी, आंदोलने व कार्यक्रम या सर्वांच्या अनुभवातून त्यांनी हा निष्कर्ष काढला की, सशस्त्र क्रांतीचा मार्ग सर्वसामान्य जनतेला भावणारा नाही. यापेक्षा लोकांमध्ये विशुद्ध देशभक्तीची भावना स्थायी स्वरूपात जागृत करणे, अनुशासन निर्माण करणे, स्वार्थत्यागाची भावना जागवणे, राष्ट्रासाठी क्षण-क्षण व कण-कण झिजण्याची भावना उत्पन्न करणे आवश्यक आहे. याच त्यांच्या चिंतनातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म झाला.

# गोधन जगवा !

राज्यातील ५६० गोशाळांच्या बँक खात्यांत 'देशी गोवंश परिपोषण योजने'चे २५ कोटी ४४ लाख रुपयांचे अनुदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने नुकतेच जमा करण्यात आले. जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च अशा ३ महिन्यांतील हे अनुदान आहे. गोशाळांमधील देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रतिदिन प्रती गाय ५० रुपये अनुदान योजनेंतर्गत राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६ सहस्र ५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६० सहस्र ५०० रुपये अनुदान आयोगाच्या वतीने लाभार्थी गोशाळांना वितरित करण्यात आले. हे अनुदान केवळ नोंदणीकृत गोशाळांना देण्यात येणार असून राज्यात आज जवळपास ११०० हुन अधिक गोशाळा आहेत त्यामुळे बाकीच्या गोशाळांचे काय हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. २०१५ साली देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री असताना राज्यात गोवंश हत्या बंदी कायदा करण्यात आला तर गतवर्षी राज्य सरकारने गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिला. गोमातेला राज्यमातेचा दर्जा देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

गोवंशाने भरलेलया गाड्या पोलिसांकडून किंवा गोरक्षकांकडून पकडल्या गेल्याच्या बातम्या हल्ली प्रतिदिन कोणत्या ना कोणत्या वृत्तपत्रात वाचायला मिळतात. ज्या पद्धतीने या गाड्यांमध्ये गोवंश भरलेले असतात ते पाहिल्यावर कोणत्याही हिंदूंच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहणार नाही. गाड्यांमध्ये अत्यंत निर्दयपणे कोंबून भरलेल्या गोवंशांपैकी काही गोवंश तर प्रवासातच मृत पावतात. हे सर्व पाहिल्यावर राज्यात खरोखर गोवंश हत्याबंदी कायदा आहे का, असा प्रश्न पडतो. जर कायदा अस्तित्वात आहे तर गुन्हेगारांना त्याचे भय का वाटत नाही ? राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू होऊन आज १० वर्षे झाली. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा असला तरी गोहत्या थांबलेल्या नाहीत. अनेक ठिकाणी प्रतिदिन गोवंश कापले जातात. हिंदूंना पूजनीय असणाऱ्या गोमातेला आणि गोवंशाला कायद्याने संरक्षण मिळावे म्हणून हा कायदा करण्यात आला, मात्र कायद्याची अंमलबजावणी आज केवळ कागदावरच होताना दिसतेय.



गोहत्या बंदी कायदा राष्ट्रीय स्तरावर करण्याची आणि गाईला राष्ट्रीय पशू म्हणून घोषित करण्याची मागणी भाजपचे खासदार किरोडी लाल मीणा यांनी मध्यंतरी राज्यसभेत केली होती. भारतात बहुसंख्य असलेल्या हिंदूंना गाय ही अत्यंत पूजनीय आहे. कोणतेही शुभकार्य असो किंवा धार्मिक पूजाविधी असो गोग्रास दिल्याशिवाय ते पूर्ण होतच नाही. स्थानाची आणि वास्तूची शुद्धी करण्यासाठी गोमूत्र शिंपडले जाते. यज्ञादी विधीच्या ठिकाणी सात्विकता निर्माण व्हावी यासाठी तेथील भूमी गाईच्या शेणाने सारवली जाते. गोमातेच्या दुधाला तर अमृताची उपमा दिली जाते. लहान बाळाला आई नंतर पहिले दूध गाईचेच दिले जाते. गायीच्या दुधाचे महत्व शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे. गाईच्या दुधापासून अनेक दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती केली जाते ज्यातून गोपालन करणाऱ्याला वर्षभर उत्पन्न मिळते. देशी गाईचे तूप हे अनेक आजारांवर अत्यंत गुणकारी मानले जाते. गाय ही भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे त्यामुळे ती उपयुक्त आणि श्रद्धेय का आहे याचा उल्लेख प्राचीन धर्मग्रंथांत आढळतो. वसिष्ठ ऋषींनी गोमातेवर संशोधन करू गाईच्या अनेक प्रजाती निर्माण केल्या. गोपालनाचे महत्व साक्षात भगवान श्रीकृष्णाने स्वतः गोपालन करून दर्शवले आहे, दत्तगुरुंनीही गोमातेची महती वर्णिली आहे. छत्रपती शिवरायांनी गोहत्येसाठी सरसावणारे कसायाचे हात जागेवर कलम करून गोरक्षणाचे महत्व रयतेवर बिंबवले होते. महाराजांनी हिंदवी स्वराज्यात गोपालनाला विशेष महत्व दिले. त्यामुळेच महाराजांना गोब्राह्मण प्रतिपालक म्हटले जाते. पंजाब केसरी महाराजा रणजीत सिंह यांनी त्यांच्या कारकिर्दीत राज्यात गोहत्या करणाऱ्याला मृत्युदंडाच्या शिक्षेचे प्रावधान केले होते. रामचंद्र बीर यांनी गोहत्या थांबवण्यासाठी ७० दिवस उपवास केला होता. हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि अध्यात्मिक संप्रदाय यांनी केलेल्या अथक पाठपुराव्यानंतर राज्यात गोवंश हत्याबंदी विधेयक आणण्यात आले; मात्र आजमितीला त्याच्या अंमलबजावणीमध्ये कमालीची ढिलाई दिसून येत आहे.

भारत हा पूर्वीपासून कृषिप्रधान देश असल्याने गोपालनाचे महत्व लोकांवर आधीपासूनच बिंबले आहे. गाईच्या पोटात ३३ कोटी देव असतात असे लहानपणी सांगितले जाई. त्यामुळे गाय दिसली की तिच्या उदराला स्पर्श करून नमस्कार करण्याचा संस्कारच मुलांवर झालेला असे. गाय आणि तिच्या वासरांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागणूक दिली जाई. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. गेल्या काही वर्षांत देशी गाईंच्या संख्येत घट होऊ लागली आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात प्रचंड उकाडा वाढला आहे. उन्हाळ्यात राज्याच्या अनेक भागांत दुष्काळी परिस्थितीमुळे फार मोठे संकट ओढवते. शेतकऱ्यांचा आणि त्याच्या कुटुंबीयांचा रोजच्या अन्न पाण्याचा प्रश्न निर्माण होतो तिथे घरच्या गोधनाला चारा कुठून देणार ? पुरेसा चारा मिळत नसल्याने गाई दूध देत नाहीत. मायेने पाळलेल्या गोधनाचे आपल्या डोळ्यासमोर हाल नको म्हणून अनेक गरीब शेतकरी आपले घरचे गोधन कसायांना विकतात. गोरक्षक आणि पोलीस माहिती मिळताच जीवावर उदार होऊन गोवंश घेऊन जाणाऱ्या गाड्या पकडतात आणि सुटका केलेल्या गोवंशांना जवळच्या गोशाळांत सोडतात. ग्रामीण भागातील गोशाळांमध्ये अशा प्रकारे सोडलेल्या गाईंमध्ये अनेक गाई या भाकड असतात. त्यामुळे गोशाळांना दूध अथवा दुग्धजन्य उत्पादनातून तितकेसे उत्पन्नही मिळत नाही. तरीही गोपालक गोशाळांमध्ये त्यांची प्रेमाने जपणूक करतात. त्यांच्या औषध पाण्यावर हजारो रुपये खर्च करतात. उन्हाळ्यात दुष्काळी परिस्थितीमुळे गोशाळेतील शेकडो गोवंशाच्या रोजच्या चारापाण्याचा खर्च भागवणे गोशाळा चालवणाऱ्यांनाही अवघड जाते.

सरकारी अनुदान प्राप्त गोशाळांपेक्षा विनाअनुदानित गोशाळांची संख्या अधिक असल्याने अशा गोशाळा चालवण्यासाठी सर्वस्वी समाजातील देणगीदारांवर अवलंबून राहावे लागते. गोशाळांतील वाढते गोधन आणि मिळणाऱ्या मर्यादित देणग्या यांमुळे गोशाळा चालवणाऱ्या अनेक गोपालकांवर दरवर्षी आर्थिक संकट ओढवते. कसायांकडून अशा गोशाळांना संपर्क करून गोवंशाची मागणी केली जाते; मात्र आज काही असेही गोपालक आहेत ज्यांनी गोशाळा चालवण्यासाठी स्वतःचे घरदार विकले आहे; मात्र एकही गोवंश कसायापर्यंत जाऊ दिलेला नाही. गोशाळेतील गोवंश जगवायचे असतील, तर केवळ सरकारवर अवलंबून राहणे चालणार नाही. त्यासाठी समाजातील सधन मंडळींनी पुढे यायला हवे. आपल्या ऐपतीनुसार गोवंशाच्या काही दिवसांचा खर्च भागेल असे अर्पण द्यायला हवे. कसायाच्या तावडीतून केवळ गोधन वाचवून चालणार नाही तर ते वाचवलेले गोधन जगवायची जबाबदारीही आपलीच आहे हे जाणून गोशाळांना शक्य तितके अर्थसाहाय्य प्रत्येकाने करायला हवे !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## लै भारी (मुर्ख)

मुर्ख होण्यात गंमत
मजाअसते लै भारी
एक एप्रिलची संधी
खरेचं असे आभारी

आम्हां बनवूनमामा
भाच्चे हसती सारी
दु:ख मनात सजले
म्हणत नाहीत सॉरी

ऑनलाईन फसवणे
पचवत राहे परोपरी
शिकवा शहाणपणा
आम्हीहोई उपकारी

सावजसापडे सहज
सराईत सर्वशिकारी
लुटू देतो सगळ्यांना
बनलो कसे भिकारी

परवानगीघेण्यासाठी
छळ करी अधिकारी
कारणे देऊन फालतू
मंजुरी लगेचं धुत्कारी

नवीनकाही सुरूकरी
बडगाबसतो सरकारी
किंमत न शहाणपणा
करुन टाका तरकारी

गाडी नाही रस्त्यावरी
टोलदणकून आकारी
आकर्षित करुन घेता
उत्तान चित्रा साकारी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

# एप्रिल फूल

आज १ एप्रिल आजचा दिवस संपूर्ण दिवस जगात एप्रिल फूल म्हणून साजरा केला जातो. फूल( षेश्र ) म्हणजे मूर्ख. या दिवशी लोक एकमेकांना मूर्ख बनवतात. आपणही या दिवशी कोणाला तरी मूर्ख बनवलेच असेल. दुसऱ्याला मूर्ख बनवून एप्रिल फूल करण्याचा आनंद आपण सगळ्यांनीच लुटला असेल. एप्रिल फूल या प्रथेची सुरवात कधी झाली हे निश्चितपणे सांगता येणार नाही. याबाबत अनेक कथा प्रचलित आहे त्यातल्या एका फ्रेंच कथेनुसार पंधराव्या शतकात फ्रान्समध्ये ज्युलियन कॅलेंडर वापरत होते त्या कॅलेंडरप्रमाणे नववर्षाची सुरवात २५ मार्च ते १ एप्रिल या आठवड्यात होत असे. या आठवड्यात सगळे लोक वसंत ऋतूचे स्वागत आणि १ एप्रिलला नववर्ष साजरे करीत असत. मात्र १५८२ सालापासून फ्रेंच लोकांनी ग्रेगरियन कॅलेंडर स्वीकारले. या कॅलेंडर नुसार १ जानेवारीपासून पासून नववर्षाचा प्रारंभ होतो. हा बदल तेथील ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांना माहीत नव्हता ते १ एप्रिलाच नववर्ष साजरा करीत त्यामुळे या लोकांना तेथील उच्चभ्रू , सुशिक्षित लोक मूर्ख ( षेश्र ) म्हणत. जे लोक १ एप्रिलला नववर्ष साजरा करीत त्यांना फ्रांसमध्ये एप्रिल फूल असे संबोधले जाई. अशा तऱ्हेने १ एप्रिलला एप्रिल फूल करण्याची प्रथा जगभर पसरली. फ्रेंच लोक भारतात आल्यानंतर भारतातही ही प्रथा सुरू झाली. १ एप्रिलला आपले मित्र, नातेवाईक यांना एप्रिल फूल करण्याची प्रथा आता चांगलीच रुजली आहे. काळानुसार बदल होत आता लोक फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियांच्या माध्यमातून एकमेकांना एप्रिल फूल करीत आहेत. आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एप्रिल फूल करून त्यातून मिळणारा आनंद हा क्षणिक असला तरी तो आजच्या धकाधकीच्या जीवनात मोलाचा आहे. दुसऱ्यांना एप्रिल फूल बनवताना प्रत्येकाने स्वतःमधील वाईट प्रवृत्तीलाही एप्रिल फूल बनवावे. दररोज उशिरा उठण्याच्या सवयीला लवकर उठून व्यायाम करून एप्रिल फूल करावे. दररोज मोबाईल वापराच्या सवयीला एप्रिल फूल करून एखादे छानसे पुस्तक वाचावे. सर्वांशी जिव्हाळ्याने वागून आपल्यातील अहंकाराला एप्रिल फूल करावे. गरजवंताला मदत करून स्वार्थाला एप्रिल फूल करावे. मोठेपणाला एप्रिल फूल करून लहान मुलांशी खेळावे. स्वतःच्या मी पणाला एप्रिल फूल करुन आम्ही बनून समाजात वावरल्यास एकमेकांविषयी असलेली कटुता कमी होईल आणि प्रत्येकाला जीवनाचा आनंद घेता येईल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# मुलांनो आई-वडिलांचा विश्वासघात करू नका - वसंत हंकारे

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि,३१, पाटण :** आयुष्यभर काबाडकष्ट करून मुलांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवसरात्र राबणाऱ्या आई-वडीलांना त्यांच्या शेवटच्या काळात विसरु नका.. आई-वडीलांनी तुमच्यात पाहिलेली स्वप्ने पूर्ण करा. त्यांचा विश्वासघात करु नका. आई-वडीलांना समजून घ्या.. लेकरांनो तुमचे आयुष्य उज्वल असेल असा संदेश प्रा. वसंत हंकारे यांनी पाटण येथे आयोजित भरकटलेली तरुणाई व न समजलेले आई-बाप या विषयावर बोलताना विद्यार्थीसह आजच्या तरुणाईला दिला.

आधार जनसेवा सामाजिक संस्था, पाटण या संस्थेने बाळासाहेब देसाई कॉलेज हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट च्या मैदानावर आयोजित केलेल्या भरकटलेली तरुणाई व न समजलेले आई-बाप या विषयावर प्रा. वसंत हंकारे बोलत होते. प्रा. हंकारे पुढे म्हणाले आजच्या मोबाईलच्या दुनियेत आजची तरुणाई भरकटलेली आहे. मुलांचे चांगले शिक्षण, चांगले भवितव्य घडविण्यासाठी आई-बाप दिवसरात्र काबाडकष्ट करून रक्ताच पाणी करत आहेत. मुलांचा प्रत्येक शब्द, प्रत्येक हट्ट मनाला व शरीराला कितीही कष्ट दु:ख सहन करावे लागले तरी ते पूर्ण करण्यासाठी राबत असताना या कष्टापाठीमागे आई-वडीलांना किती वेदना सहन कराव्या लागल्या याची जाणीव आजच्या तरुणाईला राहिली नाही. एकदा आई-वडीलांच्या समोर उभे राहून त्यांच्या डोळ्यात पाहून तुमच्यासाठी केलेले कष्ट आठवा व त्यांच्याशी प्रामाणिक रहा. ऐवढे जरी आजच्या पिढीने केले तरी ते आपल्या आयुष्यात ते यशस्वी होतील असा विश्वास यावेळी प्रा. वसंत हंकारे यांनी यावेळी दिला.




आजच्या पिढीला प्रबोधनात्मक प्रा. वसंत हंकारे यांचे व्याख्यान यशस्वी होण्यासाठी आधार जनसेवा सामाजिक संस्थेच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी- विद्यार्थीनी, तरुणाई, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ज्येष्ठ कबड्डी खेळाडूकरिता मदत निधी उभारण्यास प्रबोधिनीने पुढाकार घ्यावा




**अक्षराज : संदीप येवले**

**दि.३१, मुंबई :** ज्येष्ठ कबड्डी खेळाडूंच्या उतार वयात त्यांना थोडी फार मदत मिळवून देण्याकरिता ओम कबड्डी प्रबोधिनीने पुढाकार घ्यावा. असे भावपूर्ण उदगार आम.सचिनभाऊ अहिर यांनी ओम् कबड्डी प्रबोधिनीच्या २२व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने बोलताना काढले. गुढीपाडव्याच्या निमित्ताने दादर (पश्चिम) येथील कित्ते भंडारी सभागृह येथे हा सोहळा पार पडला. ओम् कबड्डी प्रबोधिनी कबड्डी क्षेत्रात उत्तम कार्य करीत आहे. त्यांनी या मदत निधी करिता फंड जमा करावा. त्याकरिता माझ्याकडून आपणास सर्वपरीने सहकार्य मिळेल. असे ते पुढे म्हणाले. याच कार्यक्रमात नवनिर्वाचित आमदार महेश सावंत यांचा सत्कार करण्यात आला. मुंबईतील विद्यमान खेळाडूंना वर्षाची विमा पॉलिसी उतरविण्यासाठी प्रयत्न करेन. त्याकरिता सर्व आमदारांना विनंती करून त्यांच्याकडून निधी देण्याची विनंती करेन. असे सत्काराला उत्तर देताना सावंत म्हणाले. ओम् कबड्डी प्रबोधिनीने आपल्या २२व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने जेष्ठ कबड्डी खेळाडू भारती देसाई व गोपाळ लिंग (होसमणी) यांचा कबड्डीतील अतुलनीय योगदान निमित्त पुरस्कार देऊन सन्मान केला. याप्रसंगी कबड्डी खेळाडू सचिन मुरारी कदम (ज्येष्ठ कबड्डी खेळाडू मुरारी कदम यांचे चिरंजीव) यांची भोईवाडा पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक पदी नियुक्ती झाली. यामुळे त्यांचा देखील सन्मान करण्यात आला. कबड्डी क्षेत्रातील अनिल घाटे यांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल यथोचित सन्मान करण्यात आला. आम. महेश सावंत, माजी महापौर महादेव देवळे, माजी महापौर किशोरीताई पेडणेकर, भोईवाडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन मुरारी कदम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.चित्रा नाबर-केळकर, शैला रायकर-पेडणेकर, विजया शेलार (सर्व शिवछत्रपती पुरस्कार खेळाडू), संजय सरदेसाई (शिवछत्रपती पुरस्कार - पॉवर लिफ्टिंग), मनोहर साळवी, भार्गव कदम तसेच कबड्डीतील राष्ट्रीय खेळाडू व कबड्डी रसिक आदी मान्यवर मंडळी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## २२ कोटी २२ लाख रुपयांचे विकास कामांचे अरळी येथे भूमिपूजन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.३०, पंढरपूर :** अरळी येथे पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या विकास निधीतून मंजूर झालेल्या अरळी बंधारा २२ कोटी २२ लाख निधी व इतर विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार आवताडे यांच्या हस्ते करण्यात आले. सदरवेळी आमदार समाधान आवताडे यांनी गुढीपाडवा व हिंदू नववर्ष या शुभ मुहूर्तावर ग्रामदैवत नरसिंह प्रभुचे दर्शन घेऊन सर्वांच्या भल्यासाठी प्रार्थना केली. रात्रीचा-दिवस करून निवडणुकीत अरळी गावातील अनेक सहकाऱ्यांसोबत जेष्ठांनी देखील मीच उमेदवार आहे असा प्रचार करून मतदारसंघातील कानाकोपऱ्यात पोहचले. तुम्ही सर्वांनी कष्ट घेऊन मला आमदार' म्हणून काम करण्याची संधी दिलीय याची जाणीव आणि जबाबदारी कायम ठेवून आपणा सर्वांच्या विकासासाठी व गावाच्या धोरणात्मक वैभवासाठी मी नेहमी बांधील राहून आपली सेवा करेन असे अभिवचन आमदार आवताडे यांनी यावेळी व्यक्त करून कृतज्ञता मांडली. यावेळी माजी जि.प.सदस्य बापूराया उर्फ सिद्धू चौगुले, उपसभापती रमेश भांजे, संचालक अशोक केदार, जगन्नाथ कोकरे चनबसू येणपे, माजी सरपंच गणेश गावकरे, शिवयोगाप्पा पुजारी, रावसाहेब राजमाने, राजू पाटील, श्रीमंत मेहेत्रे, शैल्य गोडसे, गंगाधर काकणकी, पावले, विजय भोसले, तिपन्ना सिंदखेड, सतिश पाटील, संतोष गणेशकर, अशोक भिंगे, शिवाजी मोहिते, शिवशंकर भांजे, तात्या पवार, मल्लिकार्जुन भांजे तसेच अरळी व पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पदाधिकारी व तरूण सहकारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

## सोलापूरचा वेताळ ठरला महाराष्ट्र केसरी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, कर्जत (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर येथे आयोजित ६६ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत अंतिम सामना सोलापूरचा वेताळ शेळके आणि मुंबईचा पृथ्वीराज पाटील यांच्यात रंगला होता. शेळके याने आक्रमक खेळी करीत पाटील याच्यावर ७ गुणांनी मात करत केसरी किताब आणि मानाची गदा पटकावली. या कुस्तीत पाटील याला अवघा एक गुण मिळविला आला. तो उपमहाराष्ट्र केसरी ठरला. कुस्ती जिंकल्यानंतर वेताळ शेळके याच्या समर्थकांनी मोठा जल्लोष केला. यावेळी ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार शरद पवार, माजी मंत्री आमदार जयंत पाटील, हर्षवर्धन पाटील, खासदार नीलेश लंके, आमदार रोहित पवार, धैर्यशील मोहिते, आमदार जितेंद्र आव्हाड, महादेव जानकर, किशोर दराडे, राजाभाऊ खरे, हेमंत ओगले, नारायण आबा पाटील, राजेंद्र फाळके, समरजीत घाडगे, कुस्तीगीर परिषदेचे बाळासाहेब लांडगे आदी उपस्थित होते. महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद आणि आमदार रोहित पवार मित्रमंडळ कर्जत-जामखेडच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. येथील संत सद्गुरू गोदड महाराज क्रीडानगरीत नुकतीच केसरीची अंतिम लढत पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. प्रत्येक लढतीला मैदानात तुतारी आणि हलगीचा निनाद घुमत होता.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील दीड हजारांहून अधिक लाडक्या बहिणींच्या नावे चारचाकी

### महिला बालकल्याण परिवहन विभागाकडून पडताळणी सुरू




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांची पडताळणी राज्य सरकारकडून सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार परिवहन विभागाकडे चारचाकी वाहनधारक म्हणून नोंदणी असलेल्या लाभार्थींची यादी महिला व बाल कल्याण विभागाकडे पाठवली गेली होती. या यादीनुसार अहिल्यानगर जिल्ह्यात योजनेचा लाभ घेत असलेल्या सुमारे दीड हजार महिलांच्या नावे चारचाकी वाहन असल्याचे आढळल्याचे समजले आहे. महिला व बालकल्याण विभागाकडील अधिकाऱ्याकडून ही माहिती उपलब्ध झाली.

अहिल्यानगर जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सुमारे १२ लाखांवर लाभार्थी आहेत. या पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आता सुरू करण्यात आली आहे. राज्य सरकार योजना बंद करणार नसल्याचे जाहीर करत असले तरी प्रत्यक्षात विविध अटी व नियम लागू करत त्याची पडताळणी सुरू करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी ही योजना सुरू करण्यात आली होती. केवळ महिलांच्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे त्या योजनेसाठी पात्र ठरवल्या गेल्या होत्या व दर महिन्याला दीड हजार रुपये लाभ दिला जात आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात १२ लाखांवर महिला पात्र ठरल्या होत्या. सुरुवातीला ३ महिने लाभ दिला गेला. निवडणुकीनंतर मात्र पात्र लाभार्थी महिलांची तपासणी सुरू करण्यात आली आहे. राज्य सरकारकडून परिवहन विभागाकडे चारचाकीची नोंद असणाऱ्या महिलांची माहिती घेण्यात आली. त्यानुसार मार्चच्या पहिल्या आठवड्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे २२ हजार महिलांची यादी महिला व बालकल्याण विभागाकडे पडताळणीसाठी पाठवली गेली.

या यादीनुसार पहिल्या टप्प्यात जिल्ह्यात दीड हजार महिलांच्या नावे चारचाकी वाहन असल्याची नोंद आढळली आहे. ही माहिती राज्य सरकारकडे पाठवली जाणार आहे. चारचाकी वाहन असणाऱ्या महिलांच्या नावाची यादी तपासणीसाठी परिवहन विभागाकडे पाठवल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

## हजारो मुस्लिम बांधवांनी ईदगाह मैदानावर केली सामुदायिक नमाज अदा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** नगर शहरात रमजान ईद (ईद-उल-फित्र) सोमवार, दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी उत्साहात व शांततेत पार पडली. सकाळी १० वाजता ईदची सामुदायिक नमाज कोठला येथील ईदगाह मैदानात अदा करण्यात आली. मौलाना नदिम अख्तर यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण करण्यात आले. नमाजसाठी शहरातील मुस्लिम बांधव आबालवृद्धांसह हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

रमजानच्या महिन्यात केलेल्या रोजा (उपवासाची) सांगता ईदच्या दिवशी झाली. रमजान महिन्याच्या २९ उपवासांनंतर रविवारी संध्याकाळी चंद्रदर्शन झाल्याने दिनांक ३१ मार्च रोजी ईद सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील विविध भागांतील मशिदमध्ये सकाळी ७ वाजल्यापासून ईदच्या नमाजाची व्यवस्था करण्यात आली होती. अनेक मशिदमध्ये मुस्लिम भाविकांनी नमाज अदा केली. ईदगाहच्या सामुदायिक नमाजानंतर धार्मिक एकात्मता आणि देशाच्या समृद्धी व शांततेसाठी अल्लाहचरणी प्रार्थना करण्यात आली. मुस्लिम समाजाच्या वतीने काही युवकांनी वक्फ बोर्ड विधेयकाला विरोध दर्शविणारे फलक झळकावले. ईद शांततेत होण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने ईदगाह मैदान व शहरातील विविध भागात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोठला येथून जाणारी वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळविण्यात आली होती. नमाजनंतर शहरातील विविध कबरस्तान व दर्ग्यांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गद केली होती. घरोघरी शीरखुर्मा, गुलगुले व बिर्याणीचा बेत होता. रविवारी झालेला गुढी पाडवा व सोमवारी झालेल्या ईदचा उत्साह शहरात दिसून आला. शहरात दिवसभर मुस्लिम बांधवांसह इतर समाजबांधवांनी एकमेकांना भेटून ईदच्या व पाडव्याच्या एकमेकांना शुभेच्छा देत होते. यानिमित्त शहरात सामाजिक एकतेचे दर्शन ही घडले.



## मुख्य रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे, धुळीमुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात; नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.३१, हदगाव (नांदेड) :** हदगांव हा जुना तालुका असुन शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे.परंतु नागरिकांना सुविधा मात्र मिळत नाहीत. शहरातील मुख्य रस्त्या म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जुनं बसस्थानक हा आहे. या रस्त्यावर एवढ्या मोठ्या प्रमाणावर धूळ साचलेली आहे की, रस्त्याने नागरिकांना पायी जाणे सुध्दा सोपे नाही. या धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

यामुळे श्वसनाचे आजार होण्याची शक्यता आहे. कोरोना या महामारीतुन बरे झालेल्या लोकांना याचा अतोनात त्रास होत आहे. परंतु याकडे नगरपालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे नागरीकांत बोलल्या जात आहे. नवीन झालेल्या एकाठिकाणचा निकृष्ट रोड उखडून टाकला असून त्यामुळे दोन्ही बाजूंच्या दुकानात या रस्त्याची धुळ जावुन दुकानदारी करणे सुध्दा अवघड झाले आहे. तसेच दुसरा मुख्य रस्ता आझाद चौक ते पोलिस कॉलनीकडे जाणारा या रस्त्यावर अक्षरशा दोन्ही बाजूला अतिक्रमण झाले असून हा रस्ता अतिक्रमणाच्या विळख्यात अडकला आहे. याकडे न.पा.प्रशासनाने त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे.

या रस्त्यावर दोन्ही बाजूला मोठमोठे हातगाडे लावल्याने लहान सहान अपघात सुध्दा होत आहेत. तरी वेळीच लक्ष देवून आझाद चौक ते पोलिस कॉलनी मुख्य रस्त्या न.पा.प्रशासनाने पूर्णपणे खुल्ला करून देण्यात यावा. असे नागरिकांचे मत आहे.

## खामसवाडी येथे मोफत पाणपोईचे उद्घाटन



**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.३०, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील छत्रपती संभाजी महाराज चौकामध्ये गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर दिनांक ३० मार्च २०२५ रोजी ह.भ.प भारत महाराज शेळके, गावचे सरपंच अमोल पाटील, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन संजय पाटील यांच्या हस्ते कै.तुकाराम निवृत्ती बंडगर यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव सामाजिक कार्यकर्ते श्री ज्ञानेश्वर बंडगर यांच्या संकल्पनेतून यंदाच्या उन्हाळ्यामध्ये जनतेसाठी मोफत जार द्वारे पाणपोईच्या माध्यमातून थंड पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे.

उन्हाचा पारा वाढल्याने गावांमधील मुख्य चौकात ही पाणपोई टाकुन जनतेची या माध्यमातून सोय करण्यात आली आहे.

या उद्घाटनप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य तथा माजी उपसरपंच किरण पाटील, ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर शेळके, किशोर शेळके, निलेश माने, महादेव शेळके, शरद शेळके, राजाभाऊ पाटील, गोपाळ शेळके, अंगद माळी, सचिन शेळके, बालाजी चौरे, शिवाजी बोबडे, अनिकेत बंडगर,

अजय बंडगर, रोहन बंडगर, ऋतिक बंडगर, चिंटू बंडगर, सुशील पाटील रणजित देशमाने, कुलदीप गावठी, विनोद माने, सतीश माने, विजय कुमार शेळके, महेंद्र कुमार शेळके, शंकर तांदळे, राजेश झोरी, शहाजी शेळके, अश्रूबा शेळके, सुनील तांबारे, बाबा बंडगर, सयाजी डोईफोडे, बापु पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हायकोर्टाच्या आदेशाने राळेगणसिद्धी ते नारायणगव्हाण शिवरस्त्याची रोव्हरद्वारे मोजणी सुरू

**अक्षराज : राजकूमार इकडे**

**दि.३१, सुपा (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील राळेगणसिद्धी ते नारायणगव्हाण शिवरस्त्यापासुन सुरू झालेला महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीचा लढा प्रशासकीय संघर्षातुन न्याय न मिळाल्याने ॲड.प्रतिक्षा काळे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ छत्रपती संभाजीनगर हायकोर्टात याचिका दाखल केली ॲड. प्रतिक्षा काळे यांनी शेतकऱ्यांची प्रभावीपणे बाजू मांडत याठिकाणी शेतकऱ्यांना मोठे यश प्राप्त झाले.

यावेळी हायकोर्टाने ६० दिवसात शिव पानंद शेतरस्त्यांच्या हद्द निश्चितीचे आदेश तहसिलला देण्यात आले. परंतु तहसिल कार्यालयाकडून पुन्हा झालेली दिरंगाई पाठपुरावा करूनही न्याय न मिळाल्याने पारनेर तहसिलदारांविरोधात अवमान याचिका दाखल केली. त्याबरोबर पिढ्यान पिढ्या प्रशासकीय न्यायालयीन संघर्ष संपावा या उद्देशाने राज्यातील शेतकऱ्यांची या संघर्षातुन सुटका करण्यासाठी पुढच्या पिढीला न्याय देण्यासाठी राज्यव्यापी जनजागृती जनआंदोलन, प्रशासकीय न्यायालयीन संघर्ष महाराष्ट्र शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून करण्यात ठेवत शासनिर्णयाची अंमलबजावणी, पेरू वाटप आंदोलन, ग्रामप्रशासन, तालुका प्रशासन, जिल्हा प्रशासनासह, राज्यमंत्र्यांना पत्रव्यवहार करत सरकार प्रशासणाचे चळवळीच्या माध्यमातून लक्ष वेधत राज्य सरकारला राज्यातल्या गाव नकाशावरील सर्व शिवपानंद शेत रस्त्यांच्या हद्द निश्चित करण्यात वहिवाटीच्या सर्व शेतरस्त्यांना गाव नकाशावर घ्यावे. शिव पानंद, सर्वे नंबर, गाडीमार्ग, पाय मार्ग आदी सर्वच शेतरस्त्यांच्या लांबी रुंदी नकाशावर घेवून प्रत्येक रस्त्याला नंबरी लावावेत त्यांचे विशिष्ट मुदतीत सातत्याने सर्वेक्षण व्हावे. नंबरी हटवणारांना दंड सुरू करून कायदेशिर कारवाई व्हावी व दर्जेदार शेतरस्ते शेतकऱ्यांना मिळावेत, तहसिलसह, प्रांत कार्यालयातील प्रलंबित रस्ता केसेस तातडीने निकाली काढाव्यात, वाटपत्रात शेत रस्ता नमूदकेल्याशिवाय वाटपपत्र मंजूर करू नये शारूननिर्णया प्रमाणे मोजणी शुल्क, संरक्षणफी आकारू नये आदी २१ मागण्या सरकारकडे चळवळीच्या वतीने करण्यात आलेल्या आहेत.

त्याबरोबर मुंबई आझाद मैदानावर दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी धरणे आंदोलन तसेच दिनांक २२ एप्रिल २०२५ ला जलत्याग करत लाक्षणिक उपोषण आंदोलन चळवळीच्या माध्यमातून करण्याचा इशारा चळवळीच्या माध्यामातुन दिला असताना दरम्यानच्या काळातच सदर राळेगणसिद्धी नारायणगव्हाण शिवरस्ता संदर्भात हायकोर्टाच्या आदेशानुसार तालुका प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे. सदर शिवरस्त्याची मोजणी सुरू केली असुन लवकरच हद्द निश्चिती करून शिवरस्ता खुला करण्याचे आश्वासन तालुका प्रशासनाने दिले आहे. पारनेर भुमिअभिलेखचे उपधीक्षक माधवराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका भुमिअभिलेखचे अविनाश ठोकळ, किरण हराळ, संदिप भोसले यांनी मोजणी सुरू केली. यावेळी तलाठी भाऊसाहेब बढे, अमोल सरकाळे, महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील, शिरूर कृती समितीचे शांताराम पानमंद, दत्तात्रय बांगर, भाऊसाहेब गाजरे कांतीलाल औटी रुपेश फटांगडे, सोमनाथ फटांगडे, गोपीनाथ औटी, रामदास फटांगडे, रोहित फटांगडे, मच्छिंद्र औटी, निलेश औटी, सिताराम गाजरे, विलास औटी, शिवाजी मापारी, बजरंग औटी, बाबुराव कळमकर, नितीनभैय्या शेळके, अनिल उगले, संपत उगले, हौशिराम कुदळे, दसरे आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुस्तके रद्दीत देतांना....!

मुलीचे शालेय पुस्तके रद्दीत देतांना मनाला थोडंसं दुःख झालं, कारण जी पुस्तके मनुष्याला रद्दी होण्यापासून वाचवतात तीच पुस्तके रद्दीत देतांना थोडस वाईट वाटणारच..! सध्याच्या आयसीएसई शिक्षण पद्धतीमध्ये दरवर्षी नवीन पुस्तके विकत घ्यावी लागतात. परत नवीन शैक्षणिक वर्षांमध्ये पुढील वर्षाचे पुस्तके विकत घ्यावे लागतात व मागील वर्षाचे पुस्तके घरात पुस्तकांची गर्दी नको म्हणून रद्दीमध्ये द्यावे लागतात. त्याचबरोबर वह्या सुद्धा....!वह्यांची गोष्ट वेगळी आहे,कारण त्यावर परत परत लिहिता येत नाही. मात्र पुस्तकांचे मात्र तसे नाही. ज्या वर्गासाठी पुस्तक तयार केले अथवा ज्या वर्गासाठी पुस्तकाची निर्मिती केली तेच पुस्तक मागील वर्गाच्या मुलांसाठी उपयोगात येऊ शकते, कारण त्यामध्ये एखाद्या विषयाची माहिती उदा. वर्ग दुसरा अथवा तिसरा घेऊ एखाद्या या पुस्तकातील प्राण्याविषयी माहिती आहे.मानवी शरीराविषयी माहिती आहे जसे की,हात पाय,डोळे, नाक वगैरे ती थोडी ना बदलणारी आहे म्हणून,पुढील वर्गातील मुलांची पुस्तके मागील वर्गातील मुलांसाठी उपयुक्तच असणार आहे.मग तो विषय कुठलाही असो इंग्रजी,गणित विज्ञान वगैरे,मग ह्या आयसीएसई शालेय शिक्षण पद्धतीचा दरवर्षी नवीन पुस्तके विकत घेण्याचा अट्टाहास कशासाठी? या सर्व घडामोडी मध्ये केवळ शैक्षणिक संस्था व प्रकाशन संस्थेचा व्यावसायिक दृष्टिकोन दिसून येत आहे.यातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या पालकांची आर्थिक पिळवणूक होताना दिसून येते.

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची इयत्ता पहिली पासून ते दहावीपर्यंतचे पुस्तके तीच राहतात. मराठी माध्यमातून शिकणारी आम्ही मुले इयत्ता पाचवीत घेतलेली पुस्तके जपून वापरून मागील इयत्तेच्या अर्थात चौथीतील मुलांना विकायचो. तोही पुस्तकांचा दर्जा लक्षात घेऊन छान असल्यास पाऊण किमतीमध्ये व थोडेसे जास्त वापरलेले असल्यास अर्ध्या किमतीमध्ये विकायचो. विकलेली पुस्तके व त्यातील मिळालेल्या पैश्यातून परत पुढील वर्गासाठी त्याच पद्धतीचे अर्ध्या किंवा पाऊण किमतीमध्ये मित्राकडून विकत घ्यायचो. जुनी पुस्तकं विकून मिळालेल्या पैसे व त्यात वीस पंचवीस रुपयांची भर टाकून विकत घेतलेली पुस्तकं घरी आणल्यावर लिंबाच्या झाडा पासून काढून आणलेल्या डिंकाने चिटकवायचो. पुस्तकाचं मुखपृष्ठ व मलपृष्ठ खराब होऊ नये म्हणून त्याला साध्या वर्तमानपत्राचे किंवा विटकरी रंगाचे कव्हर लावायचो. मुखपृष्ठावर स्वतः चे नाव व विषयाचे नाव टाकायचो,त्यामुळे पुस्तक कोणत्या विषयाचे आहे ते समजण्यास मदत



व्हायची. या सर्व घडामोडी आम्ही आई-वडिलांच्या माघारीच करायचो.त्यांना माहितही नसायचे. अर्थात अशा या आमच्या करामतीतून आई-वडिलांना फारसा त्रास झाला नाही.शैक्षणिक बाबतीत त्यांचे ऋण खूप आहेच पण त्यांची हलाखीची परिस्थिती.. त्याचबरोबर बराच पालक वर्ग कमी शिकलेला तर काही पूर्ण अडाणी बिच्चारे, त्यांना तर हेही माहीत नसायचे की, आपला मुलगा कोणत्या इयत्तेत शिकतोय. त्यांचे मुलं अर्थात सहकारी मित्र आज काहीतरी चांगल्या हुद्द्यावर आहे.नोकरी,व्यवसाय करत आहे.

पुस्तके दरवर्षी नवीन काय आणि जुने काय त्यांची ज्ञानदानात कुठे कमतरता असणार..! मानवी शरीराचे अवयव हे जुन्या पुस्तकातही तेच आणि नवीन पुस्तकातही तेच..! कदाचित पुस्तके ही जुनी होत नसतातच,याउलट ते कित्येकांना आपल्या ज्ञानाचा बाळकडू पाजून शैक्षणिक सदृढ करतात. समृद्ध करतात.कित्येकांना उद्योगधंदे, नोकरीला लावतात व समाजात सुशिक्षित व साक्षर म्हणून ओळख निर्माण करतात. मान्य आहे सध्याचा काळ बदलत आहे. नवीन शैक्षणिक पद्धती येत आहे. मात्र शिक्षण हे त्या काळातील सर्वश्रेष्ठ होते आणि या काळातील श्रेष्ठच आहे. यात शंका नाही परंतु, या शैक्षणिक संस्थानी जे शिक्षणाचे बाजारीकरण व इतर गोष्टींचा फाफटपसारा लावलाय व भरमसाठ व्यवसायिक दृष्टिकोन यातून विद्यार्थी व पालक वर्गांची मानसिक कुचंबना होत आहे. त्यातून आर्थिक पिळवणूक होत आहे.नर्सरी, केजी वन, केजी टू चे एका वर्षाचा शैक्षणिक खर्च जवळपास पन्नास हजार रुपयापर्यंत आहे जवळपास अर्धा लाख रुपये....! गोरगरीब सामान्य लोकांचे काय? त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे? या स्पर्धेच्या युगात त्यांचे काय?त्यांनी कुठून आणायचा एवढा पैसा?कसे शिकवायचे मुलांना?शाळेत जाताना श्रीमंताची मुले छान सुटा-बुटात स्कूल बस मध्ये जातात. . कुणाच्या डब्यामध्ये खाता खावल्या जाणार नाही एवढे, अन एक भुकेपायी तडफडतोय.एकाचा पायात वारानुसार स्पोर्टशूज व वेगवेगळी रंगीबेरंगी स्पोर्ट ड्रेस तर, एका विद्यार्थ्याच्या पायात साधी चप्पलही नाही.एकाच्या पाठीवर महागडी दप्तरे तर एकाच्या पाठीवर शेतासाठी आणलेल्या बी- बियाण्यांची पिशवी थैली वगैरे...! हे सर्व विषमतेचे चित्र गोरगरिबांची मुले केविलवाण्या नजरेनं बघतात. किती भयंकर! हृदयद्रावक चित्र आहे हे...! दोघेही ज्ञानाच्या मंदिरात ज्ञानासाठी चालेलत ना...! दोघेही शिकताहेत उद्याच्या भविष्यासाठी, राष्ट्राच्या प्रगतीसाठी, मग ही, भयंकर विषमता का? एक वेळेस पालकांसाठी गरीब-श्रीमंतीची दरी ठीक आहे.परंतु ह्या चिमुकल्यांसाठी उद्याचे भविष्य घडवणाऱ्यांसाठी ही दरी का म्हणून? ते सुद्धा भविष्यात राष्ट्राच्या विकासासाठी हातभार लावणार, जनसेवेसाठी धावणार मग ही शैक्षणिक विषमता का? सर्वांसाठी समान शिक्षण पद्धती समान अधिकार हवा.

एका गोष्टीचे चिंतन केल्यास लक्षात येते कि, आतापर्यंत जेवढेही विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यशस्वी झाले आहेत. प्रशासकीय सेवेत अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्याचबरोबर राज्य शासन व केंद्र शासनाच्या वर्ग तीन व चार पदावर कार्यरत आहेत. ते सर्व गोरगरिब घरातील असतात,त्यापैकी कित्येकांचे वडील टॅक्सी ड्रायव्हर, सायकल पंचर वाले, शेतकरी, दूधवाले, शेतमजूर, हातमजूर असतात.हलाखीच्या परिस्थितीतही मुलांना शिकवतात. व मुलेही आहे त्या परिस्थितीत शिकतात. यांनासुद्धा जुन्या पुस्तकांनीच घडवले. जुनी- नवे हे फक्त आपल्यासाठी...!पुस्तके ते पुस्तक असतात. केवळ आपल्याला घडवण्याचेच कार्य करणार, सुशिक्षित, ज्ञानी बनवणार, संस्कारशिल बनवणार....!

अशाप्रकारे सध्याच्या काळातील हा शिक्षणाचा बाजार व इतर फाफटपसारा बघून खरंच खूप दुःख होतं कारण, हे शिक्षण फक्त भयंकर प्रगती करेल, विकास करेल तंत्रज्ञानात उच्चस्थान गाठेल मात्र संस्कार, परिस्थिती जाणीव करून देणारे, नीतिमूल्यांचे शिक्षण देताना मात्र कुठेतरी कमीच पडणार, हे तेवढेचं खरं आहे. म्हणतात ना, ज्ञान गरिबीतूनच जन्माला येतं या पद्धतीने शिक्षण सुद्धा हे तळमळीतून, भेडसावणाऱ्या समस्येतून विकसित होत असते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना शिक्षणाप्रती असणारी ओढ,जाणिव व मेहनतीतून त्यांचा शैक्षणिक विकसित होत असतो.

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

# मौका सबको मिलता है!

मिळालेल्या संधीचं सोनं जो व्यक्ती करतो,तो पुढे जातो . प्रत्येकाचा एक दिवस येत असतो. ' उकिरड्याचं सुद्धा पांग फिटतं ', असं आपल्याकडे म्हटलं जातं.

एखादा गोलंदाज त्याच्या षटकात फलंदाजाला न खेळता येणारे अवघड चेंडू टाकतो. अवघड चेंडूंना फलंदाजाला संयमाने खेळावं लागतं ; नाहीतर बाद होण्याचा धोका असतो. त्याच षटकात एखादा चेंडू त्याच्याकडून फुलटॉस टाकला जातो. मग मात्र फलंदाजाला उत्तुंग षटकार मारून आपल्या वाया गेलेल्या चेंडूंची कसर भरून काढावी लागते. त्याचप्रमाणे बगळा तळ्यामध्ये डोळे मिटून साधूप्रमाणे एका पायावर ध्यान लावून थांबतो. त्याला असे निर्विकारपणे थांबलेले पाहून त्या तळ्यातील मासे त्याच्या आसपास तरंगू लागतात. मग बगळा आपल्या क्रूर लांब चोचीने एका गुबगुबीत माशाला आपले भक्ष करतो. अर्थात तो संधीची वाट पाहत असतो.

अशा पद्धतीने मोका येण्याची बगळा किंवा क्रिकेट मधील फलंदाज संयम बाळगून वाट पाहतात. त्यांच्यासाठी या ओळी लागू होतात...

मौका सबको मिलता है, वक़्त सबका बदलता है,

कोई चाल चल जाता है, कोई बर्दाश्त कर जाता है !

या दोन ओळीत मानवी जीवनाचे रहस्य सांगितलं आहे. समोर आलेली संधी ही संधी आहे, हे ओळखता आलं पाहिजे. लहानपणा पासून साखळदंडात बांधून ठेवलेला हत्ती तारुण्यत देखील त्याच साखळदंडात कैद राहतो. खरंतर त्याच्या अंगात ते साखळदंड तोडण्याची ताकद आलेली असते. परंतु त्याला आपल्या ताकदीचा अंदाज नसतो. पारतंत्र्यात राहण्याची त्याला सवय झालेली असते. पुढे आयुष्यभर तो ती गुलामगिरी बर्दाश्त करत राहतो.

तारुण्यात ताकतवान असणारा वृद्धकाळात कमजोर होतो,तर त्याच्यासमोर बाल्यावस्थेत असणारा दुसरा एखादा कमजोर असतो,जो उद्या तरुण होऊन ताकतवान बनवणार असतो . हा तर निसर्गाचा नियम आहे. निसर्ग हा सर्वात शक्तिमान आहे. तो साऱ्यांना संधी देतो. त्याच्याकडे असणारं सर्वकाही तो सर्वांना समान वाटतो. काहीजण निसर्गाकडून हिरावून घेण्याचा प्रयत्न करतात. पण निसर्ग त्याला योग्य वेळी धडा शिकवतो.

आज हुकूमत गाजवणारे उद्या मांडलिक बनतात, तर मांडलिक असणारे पुढे आपली हुकूमत गाजवू लागतात. म्हणून ' मी सर्व शक्तिमान आहे!' ' मी गळ्यात अमर पट्टा बांधून आलो आहे!' ' कायम गुलाल आपलाच!' या अविर्भावात कायम राहू नये. ज्याला तुम्ही आज आपल्या टाचेखाली धरत आहात, तो उद्या तुम्हालाही टाचेखाली घेण्यास मागे पुढे पहात नसतो. ' जशास तसे वागणे! ' ही मानवी प्रवृत्ती आहे.

सत्ता, ताकद,पैसा आणि बुद्धिमत्ता या बळावर तुम्ही दुसऱ्यावर हुकूमत गाजवता, पण उद्या दुसरा याच हत्याराचा उपयोग करून तुमच्यावर हुकूमत गाजवेल... म्हणून सत्तेत असताना नम्रता आणि सत्तेतून पायउतार होताच कमीपणा वाटू देऊ नका. दुसऱ्यावर हुकूमत गाजवण्याची नशा बाळगू नका. कारण मोका सबको मिलता है !

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

# नाशिकमध्ये सोनसाखळी चोरांचा धुमाकूळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, नाशिक :** शहर परिसरात सोनसाखळी चोरांनी धुमाकूळ घातला असून ठिकठिकाणी सोनसाखळी चोरी झाली. यामध्ये लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला असून आडगाव, गंगापूर आणि इंदिरानगर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांकडून सण, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर नाकाबंदी, वाढीव गस्त असे उपाय केले गेले असतांना चोऱ्या रोखण्यात अपयश आल्याने चोरांनी पोलिसांना आव्हान दिल्याचे मानले जात आहे.

तपोवनातील मनिषा पवार (रा. केवडीबन, दंत महाविद्यालयामागे) या आई विमल सांगलीकर यांच्याबरोबर शनिवारी रात्री स्वामी नारायण मंदिरात देवदर्शनासाठी गेल्या होत्या. देवदर्शन आटोपून मायलेकी घराकडे पायी जात निघाल्या.

विवियाना सोसायटीजवळून दोन्ही मायलेकी जात असतांना पाठीमागून आलेल्या एका तरूणाने सांगलीकर यांच्या गळ्यातील सुमारे ९४ हजार ५०० रुपयांची सोनसाखळी आणि पोत हिसकावून कन्नमवार पुलाखाली उभ्या असलेल्या दुचाकीस्वार जोडीदाराच्या दिशेने पोबारा केला. यानंतर दोघे भामटे अमरधामकडे जाणाऱ्या मार्गाने पसार झाल्याचे पवार यांनी सांगितले. याप्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरा प्रकार गंगापूररोडवरील शांतीनिकेतन चौकात घडला. कविता आबड (रा.ऋषिराज होरायझन) या शनिवारी सायंकाळच्या वेळेस आपल्या नातूबरोबर परिसरात फेरफटका मारण्यासाठी गेल्या होत्या. फेरफटका मारून दोघे घराकडे पायी जात असतांना शांतीनिकेतन चौकातील अपोलो मेडिकल स्टोअर्ससमोर दुचाकीवर आलेल्या भामट्यांनी आबड यांच्या गळ्यातील सुमारे ५५ हजार रुपयांची सोनसाखळी हिसकावून नेली. याबाबत गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोकर्णा कदम (रा. राजसारथी सोसायटी) या शनिवारी रात्री मुलगा आणि सासू यांच्यासह चंदा हार्डवेअर दुकान परिसरात गेल्या होत्या. काम आटोपून सर्वजण रस्त्याने पायी घराकडे जात असताना वनसंपदा सोसायटी परिसरातील उद्यानाजवळील रोहिणी हाईटस इमारतीसमोरील चौफुलीजवळ एकाच दुचाकीवर आलेल्या तिघांपैकी एकाने कदम यांच्या गळ्यातील सुमारे ६० हजार रुपयांची सोन्याची पोत हिसकावून नेली. याप्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# थोडक्यात

## मच्छिंद्रनाथ देवस्थानाचा होमाचा कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३१, विंचूर (नाशिक) :** विंचूर पासून जवळच असलेले कृष्णवाडी (किसनवाडी) येथील श्री मच्छिंद्रनाथ मंदिरात सालाबाद प्रमाणे (वर्षं ११ वे) श्री रामनाथ बाबा कांडेकर यांच्या आशीर्वादाने व श्री रामदास बाबा मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली, अग्निहोम व लाही प्रसाद कार्यक्रम रात्री उशिरा पर्यंत विविध कार्यक्रमांनी संपन्न झाला. गुढीपाडवा या दिवशी मूर्ती पूजा, सायं.६ वा.धुप, महाआरती व नैवेद्य, सायं. ७:०० वा. महाप्रसाद व रात्री ९:००वा. अग्नि होम व लाही प्रसाद कार्यक्रम आणि शाहिर किसन पिठे (चापडगावकर) यांचा नाथ भक्ती पर गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी या कार्यक्रमात मान्यवरांना श्रीफळ व शाल देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला कृष्णवाडी पंचक्रोशीतील व दूरदूर वरून आलेले हजारो भाविकांनी दर्शनाचा, होमाचा (रहाडीचा) व महाप्रसादाचा लाभ घेतला. या महाप्रसादाचे मानकरी सुयोग वाटपाडे, नाशिक हे होते. या कार्यक्रमात राजकीय, सामाजिक, जेष्ठ, नाथ भक्तवृंद तसेच महिला वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. या कार्यक्रमासाठी किसनवाडी नाथ भक्त परिवार व विंचूर जय मल्हार भक्त परिवार यांचे मोठे योगदान होते.

## वुई टुगेदर फाउंडेशन तर्फे वेगवेगळे निस्वार्थी उपक्रम साजरे

**अक्षराज : सरिता डोंगरे**

**दि.३१, चिंचवड (पुणे) :** वूई टुगेदर फाउंडेशन नेहमीच वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे निस्वार्थी उपक्रम घेत असते.खर तर अनेक वेळा समाजात काही लोकांचे कर्तृत्व असूनही त्यांचा गौरव होत नाही किंवा पाहिजे तसे सहकार्य मिळत नाही. ते नेहमी कौतुक व फायद्यापासून वंचित राहतात. वडगाव मावळ, सुदुंबरे मधील ३ मुली २ मुले असे ५ कबड्डी खेळाडू नुकतेच हिमाचल प्रदेश मध्ये राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी गेले होते त्यांनी मोठे यश प्राप्त केले. खर तर ही खूप मोठी स्पर्धा होती. यासाठी या मुलांनी अभ्यासा सोबत कबड्डी सराव सुरु ठेवला होता. ही तारेवरची कसरत करून त्यांनी विजय प्राप्त करून आणला.त्यांचे प्रशिक्षक यांनी अत्यन्त स्वतः ला त्या मुलांसाठी झोकून देऊन दिवस रात्र त्यांचा सराव करून घेतला.खरे तर असे कसरत करून यश प्राप्त करणाऱ्या खेळाडूंचा सन्मान नक्की झालाच पाहिजे म्हणून वूई टुगेदर फाउंडेशनच्या वितीने व आदर्श शिक्षिका मंगला डोळे - सपकाळे यांच्या पुढाकाराने या मुलांचा व प्रशिक्षकाचा ट्रॉफी, शाल, गुलाब देऊन जाहीर सत्कार करण्यात आला.फाउंडेशनचे अध्यक्ष मधुकर बच्चे यांनी प्रस्थाविक मध्ये आपले मनोगत व्यक्त केले व या खेळाडूंनी ग्रामीण भागात राहत आपल्या घरची कामे करीत अभ्यास करीत कबड्डी मध्ये यश प्राप्त करणे खरोखर अभिमानास्पद आहे खेळाडूंना शाबासकी देऊन अभिनंदन केले.यावेळी प्रशिक्षक प्रतिक भोर यांनी या स्पर्धेविषयी खडतर प्रवास वगैरे माहिती दिली तर खेळाडूंनी आपल्या भावना व्यक्त केल्या व वूई टुगेदर फाउंडेशनने खेळाडूंची निस्वार्थी दखल घेऊन जाहीर सत्कार केला म्हणून ऋण व्यक्त केले. प्रशिक्षक म्हणून प्रतिक भोर यांनी सहयोग दिला,प्रथम क्रमांक आदिती ओव्हाळ तर मृणाल कोतुळकर, माणसी दरेकर, नवनाथ बेले, दुर्गेश गायकवाड यांनी द्वितीय क्रमांक मिळवीला. फाउंडेशन सचिव मंगला डोळे - सपकाळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी फाउंडेशन अध्यक्ष मधुकर बच्चे, सचिव जयंत कुलकर्णी, खजिनदार दिलीप चक्रे, सचिव मंगला डोळे - सपकाळे, लायन्स क्लब अध्यक्ष रवींद्र काळे,सलिम सय्यद, सल्लागार, रवींद्र सागडे, दिलीप पेटकर, शंकर कुलकर्णी, धनंजय मांडके,श्रीनिवास जोशी, सदाशिव गुरव, आरविंद पाटील, विलास गटणे आदी पदाधिकारी,मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. सलीम सय्यद यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## विंचूरच्या दशक्रिया विधी शेडचे सुशोभीकरण



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३१, विंचूर (नाशिक) :** विंचूर चे विद्यमान सरपंच सचिन दरेकर यांच्या संकल्पनेतून विंचूर येथील दशक्रिया विधी शेडचे सुशोभीकरण करण्यात आले. यात वॉल कंपाउंडवर संतांच्या अभंगातील ओव्या भिंती चित्र म्हणून रंगवण्यात आलेले आहेत. तसेच १२ हजार लिटरची पाण्याची टाकी तसेच नाभिक बांधवांसाठी ओट्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. दशक्रिया विधी पूजा करण्यासाठी ब्राह्मण गुरुजींना ओटाही बांधण्यात आलेला आहे. तसेच विविध प्रकारचे फुलझाडे लावण्यात आले आहे.

## राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत प्रा.अमीर इनामदार द्वितीय

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.३०, खंडाळा (सातारा) :** दिनांक २३ मार्च २०२५ रोजी थोर क्रांतिकारक शहिद भगतसिंह, राजगुरू, सुखदेव शहीद दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य शहीद भगतसिंग युवा मंच डोंबिवली, कल्याण जि.ठाणे आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, खंडाळा राज्यशास्त्र विभागात कार्यरत प्रा.अमीर इनामदार यांनी द्वितीय क्रमांक पटकवला. या स्पर्धेत मानवता आणि संत साहित्याचे योगदान या विषयावर प्रा.इनामदार यांनी संत ज्ञानेश्वर ते संत रविदास आदी संतांनी साहित्यातून समजमनातील भेदभावाच्या भिंती तोडत मानवता आणि समता रुजविण्यासाठी केलेले कार्य याविषयावर संशोधनपर लेखन केले. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा दिनांक ३० मार्च २०२५ रोजी आदर्श विद्यालय राजाजी पथ डोंबिवली पूर्व जि.ठाणे येथे साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक डॉ.संदीप गुप्ते, कवी कैलास बडगुजर, प्राचार्य शशिकांत कर्डेकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. शहिदांच्या स्वप्नातील भारत आणि सद्यस्थिती, मानवता आणि संत साहित्याचे योगदान, इतिहासाबाबत विवेकी, वैज्ञानिक दृष्टीकोन हे विषय स्पर्धेसाठी घेण्याचा हेतू वर्तमानातील तरुणाईने समग्र लेखन करावे असे आयोजक राजेंद्र परांजपे, सुनिल सामंत, धोंडीराम खराटे यांचा विस्तृत विवेचन केले. यावेळी महाविद्यालय गट व खुला गटातील विजेत्यांचा प्रमाणपत्र व रोख पारितोषिक प्रदान करत यथोचित सन्मान करण्यात आला.